# प्रेस नोट

## महाराष्ट्र पोलीस अकॅडमी येथे "Conflict Resolution" कार्यशाळा संपन्न

**नाशिक :-** महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे दिनांक २५ व २६ ऑगस्ट, २०११ रोजी **"Conflict Resolution"** या विषयावर दोन दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

ब्युरो ऑफ पोलीस रिसर्च आणि डेव्हलपमेंट, गृह विभाग, भारत सरकार पुरस्कृत या कार्यशाळेचे उदघाटन महाराष्ट्र राज्याचे गृह राज्यमंत्री श्री. सतेज पाटील यांच्या हस्ते दि. २५/०८/२०११ रोजी सकाळी ०९.०० वाजता झाले. या कार्यशाळेत भारतातील २० वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

आपल्या घरापासून थेट अंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत सगळीकडे वादविवाद होत असतात. खाजगी जीवनात वादविवादामुळे वैयक्तिक संबंधांवर परिणाम होतो. सामाजिक जिवनात या विवादाचे योग्य निराकरण झाले नाही तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवून गुन्हेगारी मध्ये वाढ होते. अनेक वेळा वादविवाद वाढत जाऊन हिंसाचार आणि दंगली इ. सारखे प्रकारही उद्‌भवण्याची शक्यता असते. यासाठी पोलीस अधिकाऱ्यांना वादविवाद निराकरण कसे करावे याबावत ज्ञान असणे आवश्यक आहे. हि बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र पोलीस अकॅडमीचे उपसंचालक डॉ. निखील गुप्ता यांनी ब्युरो ऑफ पोलीस रिसर्च आणि डेव्हलपमेंटच्या माध्यमातूनही राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा आयोजीत केली होती. डॉ. निखील गूप्ता व त्यांचे सहकारी श्रीमती सुनिता दाढे यांनी कार्यशाळेत सहभागी झालेल्या वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना वादविवाद निर्माण होण्याची कारणे, वादविवादातील दोन्ही बाजूंची मानसिक स्थिती, त्यांच्यांशी योग्य संवाद साधण्याचे कौशल्य, रागावर नियंत्रण कसे ठेवणे, वादविवाद निराकरण करतांना येणाऱ्या अडचणी, इत्यादी अनेक बाबींवर मार्गदर्शन केले.

याशिवाय महाराष्ट्र पोलीस अकॅडमीचे संचालक श्री. संजय बर्वे यांनी कार्यशाळेत सहभागी झालेल्या वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना नागरीकांना अपहरण करुन ओलीस ठेवणाऱ्या अतिरेक्यांशी कसा संवाद साधावा याबाबत मार्गदर्शन करुन प्रात्याक्षिके करुन दाखविले.

वादविवाद निराकरण कौशल्य या विषयाचे पोलीस खात्यास असलेले अनन्य महत्व लक्षात घेता गृह राज्य मंत्री श्री. सतेज पाटील यांनी डॉ. निखील गुप्ता यांना सुचविले की, या विषयावर एक वेबसाईट तयार करुन देशातील सर्व पोलीस घटकांना याचा फायदा करुन द्यावा. अशा प्रकारची कार्यशाळा सर्व पोलीस अधिकारी, प्रशासनातील सर्व अधिकारी, व्यावसायिक, व्यापार करणारे, शिक्षक, पालक - समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी उपयुक्त असल्याचे मत सर्वांनी व्यक्त केले. श्री. संजय बर्वे व डॉ. निखील गुप्ता यांनी आपल्या समारोप भाषणात उपस्थित सर्व वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना विनंती केली की, कार्यशाळेतून मिळालेले ज्ञान त्यांनी त्यांच्या राज्यात कनिष्ठ दर्जाचे पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत पोहचवून या कार्यशाळेस यशस्वी करावे.

(संजय पाटील)
पोलीस अधीक्षक (प्रशासन),
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
यांचे करीता.


MAHARASHTRA POLICE ACADEMY,
NASHIK
HCL


MAHARASHTRA POLICE ACADEMY,
NASHIK
Shri Satej Patil
Dr. Nikhil J. Gupta


MAHARASHTRA POLICE ACADEMY,
NASHIK
Bisleri
Dr. Nikhil J. Gupta


MAHARASHTRA POLICE ACADEMY,
NASHIK